# महाराष्ट्र वार्ता पत्र

## जानेवारी २०२१

वर्ष सहा Volume-VI अंक 9

(खाजगी वितरणासाठी ई वार्तापत्र)

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ वेस्टर्न रिजन



राजकमल स्टुडिओ, महात्मा गांधी हॉस्पिटल जवळ, डॉ. एस.एस.राव रोड, परेल, मुंबई - ४०० ०१२ ● मोबाईल : ९३२२०९०१३० ● Email : ffsiwr@gmail.com



संस्थापक अध्यक्ष : सत्यजित राय ● अध्यक्ष : किरण व्ही. शांताराम ● उपाध्यक्ष : सुधीर नांदगांवकर - संपादक


# अिफी ५१ : पॅनोरमांत तीन मराठी चित्रपट

**भारताचा** ५१वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव कोरोनामुळे नोव्हेंबर ऐवजी आता जानेवारी १६ ते २४ असा पणजी येथे संपन्न होणार आहे. महोत्सवात पॅनोरमात दाखवल्या जाणाऱ्या २० चित्रपटांत तीन मराठी चित्रपट आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन मराठी फिल्म आहेत. "साँड की ऑख" या चित्रपटाने पॅनोरमाचे उद्घाटन होईल.

यावर्षी पॅनोरमासाठी मराठी सिनेमाच्या २९ प्रवेशिका आल्या होत्या त्यांतून निवड समितीने ३ चित्रपट निवडले आहेत. यावर्षी निवड समितीचे अध्यक्ष "सरफरोश"चे दिग्दर्शक जॉन मॅथ्यू मथान होते तर १२ सदस्य पुढील प्रमाणे

दिग्दर्शक डॉमिनिक संगमी, दिग्दर्शक जयुमणी दत्ता, मराठी दिग्दर्शक कुमार सोहोनी, रमावीज, अभिनेत्री, कला मास्टर, नृत्यदिग्दर्शक, दिग्दर्शक राम मूर्ती. पत्रकार संघमित्र चौधरी, दिग्दर्शक सतीश पांडे, पत्रकार वैजयंती आपटे.आणि फिल्म सोसायटी ॲक्टीव्हिस्ट राधा कृष्णन यांचा समावेश होता.










कारखानिसांची वारी मधील एक दृष्य

## पॅनोरमातील २० चित्रपटांची यादी

१. **ब्रिज** (आसामी)
दिग्द. : **कृपाल कालीया**

२. **अविजात्रिक** (बंगाली)
दिग्द. : **शुभजिन मित्रा**

३. **ब्रह्मजाने गोपान कोमोटी** (बंगाली)
दिग्द. : **अरिम मुखर्जी**

४. **डॉग्ज ॲण्ड हिज मॅन** (छत्तीसगड)
दिग्द. : **सिद्धार्थ त्रिपाठी**

५. **अप, अप, ॲण्ड अप** (इंग्लीश)
दिग्द. : **गोविंद निहलानी**

६. **आवर्तन** (हिंदी)
दिग्द. : **दर्बा सहाय**

७. **साँड की ऑख** (हिंदी)
दिग्द. : **तुषार हिरानंदानी**

८. **पिंकी एफी** (कन्नड)
दिग्द. : **पृथ्वी कोनार**

९. **सेफ** (मल्याळम)
दिग्द. : **प्रदिप कालीपुरीयन**

१०. **ट्रान्स** (मल्याळम)
दिग्द. : **अन्वर रशीद**

११. **केंटीयोलानु एन्टे मलाखा** (मल्याळम)
दिग्द. : **निस्सान बशीर**

१२. **ताहिर** (मल्याळम)
दिग्द. : सिद्दक परावूर

१३. **एगी कोना** (मणीपुरी)
दिग्द. : **बॉबी वाकेनगम**

१४. **जून** (मराठी)
दिग्द.: **वैभव खिस्ती व सुन्दर गोडबोले**

१५. **प्रवास** (मराठी)
दिग्द. : **शशांक उदापूरकर**

१६. **कारखानिसांची वारी** (मराठी)
दिग्द. : **मंगेश जोशी**

१७. **कार्ला अतीता** (उडिया)
दिग्द. : **नील माधव पांडा**

१८. **नमो** (संस्कृत)
दिग्द. : **विजेश मणी**

१९. **थइन** (तामीळ)
दिग्द. : **गणेश विनायकन**

२०. **घटम** (तेलगू)
दिग्द. : **किरण कोंडामडुगुला**

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन मराठी चित्रपट

५१व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रथम दिग्दर्शन विभागात "जून" आणि महात्मागांधी पुरस्कारासाठी "प्रवास" असे दोन मराठी चित्रपट निवडले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय ज्युरीच या विभागात पारितोषिकासाठी चित्रपटांची निवड करतात.

# नाद-लय-ध्वनीची जमलेली शब्दमैफल

**'अनुनाद' हे अरुण खोपकरांचे** नवे पुस्तक म्हणजे त्यांनीच या पुस्तकातील एका लेखात म्हटल्यांप्रमाणे 'रूप पाहता लोचनी' या स्वरूपाचे देखणे ग्रंथरूप आहे. प्रसिद्ध कलादिग्दर्शक विकास गायतोंडे यांनी हे रूप सजवलं आहे. बहुविध कलांवर मनस्वी प्रेम करत मूलगामी लेखन करणाऱ्या खोपकरांचे हे नवे पुस्तक त्यांच्या आधीच्या पुस्तकाच्या मालिकेतला कळसाध्याय आहे.

त्यांचे 'गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका' हे पुस्तक चित्रपटविषयक विश्लेषणात्मक लेखनाचा नवा मानदंड प्रस्थापित करणारे आहे, तर 'चित्रव्यूह' आणि 'चलत् चित्रव्यूह' या जोड पुस्तकांत विशेष करून त्यांनी अनेक कलावंतांच्या सर्जनशील प्रेरणांचा शोध घेतला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या 'अनुनाद' या पुस्तकाचं मोल अधिक आहे.

सिनेमा आणि साहित्याचा सौंदर्यवेधी दृष्टीने शोध घेणारे चौदा लेख या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. त्या लेखांचा अनुक्रम त्यांच्या 'अनुनाद' या संकल्पनेशी समांतर जाणारा आहे.

खोपकरांची हुकमत कला व्यासंगावर आहे; तशीच ती शब्दांवर आहे. त्यांची शब्दकळा नेमकी व मोहक आहे. पहिल्या भागातील लेख या शब्दप्रेमाविषयीचे आहेत. या शब्दप्रेमातून खोपकरांनी चार आशियाई व पाच युरोपीय भाषांचे अध्ययन केले. या प्रवासात त्यांना भेटलेले भाषाप्रभू, त्या भाषिक प्रदेशातील कला, त्यातून निर्माण झालेली संस्कृती या साऱ्यांचा सौंदर्यपूर्ण धांडोळा त्यांनी घेतला आहे. त्यात त्यांची अंतर्दृष्टी, त्यांचा सौंदर्यवेध व त्यांचे विशाल संदर्भज्ञान यांचा सुरेख मेळ जमला आहे. या विभागातील लेखांत विविध भाषेतील 'शब्दकोश'-निर्मितीच्या वेदना व त्या शब्दांतून निर्माण झालेल्या पुस्तकांच्या अचंबित करणाऱ्या कथा व त्या कथानायकांच्या गोष्टीही त्यांनी अगदी निगुतीने सांगितल्या आहेत. त्यातूनच ग्रंथाचे सौंदर्य-सौष्ठत्व कशात आहे याचा अदमास घेत, शेलकी उदाहरणे सादर करत अरुण कोलटकरांच्या 'सर्पास्त्र' व 'भिजकी वही' या दोन देखण्या पुस्तकांच्या मांडणीचा समर्पक अल्प परिचयही करून दिला आहे. शब्दप्रेमिक असलेल्या खोपकरांचे चित्र-भाषेबद्दलही तितकेच ममत्व व प्रभुत्व सर्वश्रुत आहे.

या विभागातील पहिला लेख 'पर्शियन मिनिएचर' हा इराणच्या प्राचीन व समृद्ध संस्कृतीचे हृद्य शब्दचित्र रेखाटणारा आहे. त्यात खोपकर म्हणतात, 'एकीकडे इराणमधील धार्मिक अमानुषता आणि कट्टरपणा आणि दुसरीकडे इराणी सिनेमात दिसणारी अकृत्रिम सहज अनुकंपा' असा सखोल जाणिवेचा समतोल या लेखात सर्वत्र विखुरला आहे. इराणमध्ये अनेक साम्राज्ये आली आणि गेली; पण अटळ आहे ते मनाचे साम्राज्य आणि त्याला जोडणारे मुख्य सूत्र म्हणजे फारसी भाषा याचे अत्यंत सुरेख विश्लेषण त्यांनी या लेखात केले आहे.




याच विभागात 'कोरा कॅनव्हास' या पुस्तकाच्या निमित्ताने नि:शब्द अभिव्यक्तीचा ध्यास घेणाऱ्या चित्रकार प्रभाकर बरवे यांचा चित्रछंद अधोरेखित केला आहे. कधी पत्रकारितेतून, तर कधी कथा-कादंबऱ्यांतून सत्यकथन करणाऱ्या अरुण साधूंच्या शब्दछंदातून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकारले आहे. भारतातील सर्वश्रेष्ठ ॲनिमेटर राममोहन या अबोल व्यक्तीचे आयुष्य त्यांनी शब्दरेखांनी रेखाटण्याच्या ओघाने 'ॲनिमेशन' या कलेचा ओनामा सविस्तरपणे नोंदला आहे. विसाव्या शतकातील मूर्तिभंजक सिने-दिग्दर्शक म्हणून मान्यता पावलेल्या मृणाल सेन यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी जिव्हाळ्याने लिहिले आहे. 'तीव्र मध्यम' हा खोपकरांनी फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये शिकत असताना निर्माण केलेला लघुपट. या लघुपटासाठी कुमार गंधर्वांनाच गाण्याची गळ घालून लघुपट निर्मितीची गोष्ट सांगता सांगता त्यांनी या निमित्ताने स्मिता पाटीलच्या प्रथम पर्दापणाची... अर्थात एका तारकेच्या जन्माची हृद्य हकिगत सांगितली आहे. स्मिताच्या उपजत कृष्ण-धवल चेहऱ्याचे शब्दचित्र त्यातून साकारले आहे.

या विभागातील शेवटचं शब्दचित्र म्हणजे पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय उभं करणारे पी. के. नायर यांचं आणि पर्यायाने त्यांच्या संग्रहालय उभे करणाऱ्या ध्यासाची गोष्ट. 'सिने मजनू' या लेखात खोपकरांनी नायरांच्या सिनेप्रेमाची आणि त्यांच्या अपार तपस्येची हकिगत अगदी तपशिलात कथन केली आहे. त्यांच्या शब्दात ती एक 'दर्दभरी दास्तान' आहे.

या पुस्तकातील प्रदीर्घ लेख म्हणजे 'ध्वनिमाहात्म्य'. खोपकरांच्या या शब्द मैफिलीतला हा 'बडा ख्याल'. तो सुमारे शंभर पानांचा विस्तृत लेख आहे. 'चित्रपट हा एखाद्या झाडांसारखा आहे. त्याला गदगदा हलवल्यावर जे जरुरीचे असते तेवढेच राहते. बाकी सारे गळून पडते' हे चार्ली चॅप्लिनचे अवतरण उद्धृत करत खोपकरांनी 'ध्वनिमाहात्म्य'चे पारायण केले आहे.

दीर्घ व्यासंग, अंतर्दृष्टी आणि चपखल संदर्भदस्त्रोत या त्यांच्या हुकमी त्रिसूत्रीच्या साहाय्याने खोपकरांनी गेल्या शतकातील शेकडो चित्रपटांना गदगदा हलवले असून जे वाचकांना जरुरीचे आहे तेच नेमके नोंदवून ध्वनी-नाद आणि लयीचा दीर्घ प्रवास उलगडून दाखवला आहे.

'सिनेमा ही दृष्यकला आहे' या विधानात एक दुष्ट अर्धसत्य लपलेले आहे, हे सोदाहरण सांगत खोपकरांनी नाद-लय-ध्वनीचा आदिकालापासून आजवरचा प्रदीर्घ प्रवास उलगडला आहे. या लेखाचा शिरोबिंदू म्हणजे चॅप्लीनच्या विस्तीर्ण कलाप्रवाहाचे दाखले देत त्यांनी या निमित्ताने देववाणी, दैत्यवाणी आणि मनुष्यवाणी या तीनही बाबतीत चॅप्लीनच्या ध्वनिविचाराचे महत्त्व विशद केले आहे. 'ग्रेट डिक्टेटर' या चित्रपटाचा संदर्भ देत आजच्या परिस्थितीतही हुकमशाहीची तरफदारी करणाऱ्यांना खडे बोल सुनावले आहेत. या पुस्तकातला हा लेख खोपकर यांच्या चौफेर ज्ञानाचा दस्तऐवजच आहे.

पुस्तकातील अखेरचा लेख 'दूरचे प्रतिध्वनी' हा ध्वनीविषयक विविध संस्कृतीतल्या कलाविचारात दिसणाऱ्या साम्यस्थळांविषयी आहे. हे विलक्षण साम्य हाच या लेखनाचा अनुनाद आहे. कलाविषयक समृद्ध विचार, संदर्भाची कालसुसंगत टिपणी, वेधक निरीक्षणे आणि सूचक तपशील यांनी हे पुस्तक एक समृद्ध अनुभव देते. कलाप्रेमींच्या जाणिवा समृद्ध करणारे हे लेखन आवर्जून वाचावे असे आहे.

**सतीश जकातदार**
**आशय फिल्म क्लब**

**अनुनाद**
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे ३५३, मूल्य ५०० रु.
मांडणी : विकास गायतोंडे